P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

## प्रेसनोट दिनांक – ११/०३/२०२४

**दि. १०/०३/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी १२० /२०२४ भा.दं.वि कलम ३०२ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/०३/२०२४ रोजीचे १५:३० वाजताचे पुर्वी सिल्व्हर करिष्मा बिल्डींग समोर, शिवाजीवाडी, मोशी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/३/२०२४ रोजी २३/ ५६ वा |
| फिर्यादी | :- | बालाजी मारुती बाबान्ना वय २९ वर्षे, धंदाः-खा.नोकरी, राः-सिल्व्हर करिष्मा बिल्डींग समोर, शिवाजीवाडी, मोशी, पुणे. |
| आरोपी | :- | मारुती चंद्राप्पा बाबान्ना वयः-५२ वर्षे रा सिल्व्हर करिष्मा बिल्डींग समोर, शिवाजीवाडी, मोशी, पुणे येथे. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची आई वयः-४७ वर्षे या घरी असताना फिर्यादीचे वडिल नमुद आरोपी याने दारुच्या व्यसनावरुन फिर्यादीची आई वारंवार वाद करत असल्याच्या कारणावरुन चिडुन रागाच्या भरात फिर्यादीच्या आईच्या डोक्यात उजव्या कानाजवळ व उजव्या गालावर कोणत्यातरी हत्याराने मारुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पठारे ८८८८८१०९५७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी २७०/२०२४, भादवी कलम २७९, ३०४ पार्ट २, मो.वा.का.क. १८४,११९/१७७, १३२(१)(क), १३४(अ)(ब), प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २६/०२/२०२४ रोजी सकाळी ६/५५ वाजताचे दरम्यान माण येथुन रहाते घरातुन परफेक्ट थाळी हॉटेल फेज ३ गवारवाडी येथ पायी जात असताना हायटच कार सर्व्हिस जवळ रोडवर माणरोड माण ता.मुळशी, जि.पुणे येथे. |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/०३/२०२४ रोजी १७/२५ वा. |
| फिर्यादी | :- | संजय तुकाराम सुसर वय ४७ वर्षे धंदा व्यवसाय रा.रौनक अपार्टमेंट फ्लॅट नं.२०४,इंदु निवास समोर माणरोड ता.मुळशी जि.पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात वाहनावरील अज्ञात वाहन चालक. |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिक्राणी फिर्यादी यांचे सासरे रहाते घरातुन परफेक्ट थाळी हॉटेल फेज ३ गवारवाडी येथे पायी जात असताना हायटच कार सर्व्हिस जवळ रोडवर माणरोड माण ता.मुळशी,जि.पुणे येथे अज्ञात वाहनाचे अज्ञात चालकाने वाहतुकीच्या नियमाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने कार चालवुन फिर्यादीचे सासरे वय ६० वर्षे रा.साखळी खुर्द,ता.जि.बुलढाणा यांना धडक देवुन गंभीररित्या जखमी करुन व त्यांना वैद्यकीय उपचार न मिळाल्यास त्यांचा मृत्यु होवु शकतो याची जाणीव असताना देखील त्यांना जाणीवपुर्वक कोणतीही वैद्यकीय मदन न करता अपघात ठिकाणावरुन पळुन गेला आहे.तसेच फिर्यादीचे सासरे वामन भुसार यांना जखमी करुन त्यांच्या मृत्युस कारणीभुत झाला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी १४९/२०२४, भा.द.वि.कलम२७९, ३३७, मो.वा.का. कलम१८४, ११९/१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/०३/२०२४ रोजी सायंकाळी ०४/३० वा पीएमटी बसस्टॉप, मच्छिमार्केट समोर, पुणे नाशिक रोड, भोसरी पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/०३/२०२४ रोजी१७/४५ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय ५३ वर्षे |
| आरोपी | :- | मोटार सायकल वरील अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी स्वताचे रक्त तपासणी रिपोर्ट साईनाथ हॉस्पिटल मोशी येथुन घेणे असल्याने फिर्यादी हया पीएमटी बसस्टॉप, मच्छिमार्केट समोर, पुणे नाशिक रोड, भोसरी येथे रिक्षावाल्यांकडे विचारपुस करत असतांना पीएमटी चौका कडुन एक इसम त्याचे ताब्यातील मोटार सायकल वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन, भरधाव वेगाने चालवुन फिर्यादी यांना उजव्या बाजुस जोरात धडक दिली. त्यामुळे फिर्यादी रोडवर जोरात पडले. त्यामध्ये त्यांचे उजव्या पायाच्या पोटरीला व कपाळाला उजव्याबाजुस मार लागला आहे. त्यानंतर फिर्यादी यांना धडक देणारा दुचाकी स्वार हा फिर्यादीस कोणतीही वैदयकीय सेवा न पुरवीता मोशीकडे जाणा-या रोडच्या दिशेने पळुन गेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा मुंढे ९८५०३१२८३८ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी १३२ /२०२४ भा.द.वि.कलम ३२८, २७२, २७३, १८८ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १०/०३/२०२४ रोजी १३/१० वाजताचे दरम्यान मौजे कुरुळी डोंगरवस्ती, ता खेड जि पुणे येथे महाळुंगे ते स्पाईसर चौक जाणारे रोडचे बाजुस असलेल्या पंचरत्न हॉटेलचे समोर |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/०३/२०२४ रोजी १७/२३ वा. |
| फिर्यादी | :- | मंगेश देवराम कदम, पोलीस शिपाई ब.नं. २०३६ नेमणुक महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| आरोपी | :- | १)ईश्वर शेषराव घोरपडे, वय २० वर्षे, रा. कुरुळी ता खेड जि. पुणे येथे मुळ राहणार- मु पो. सुजलेगव ता. नायगाव (खैरगाव) जि. नांदेड<br>२)धनंजय राणे (पुर्ण नाव माहीत नाही) रा. कुरुळी ता.खेड जि पुणे<br>**आरोपी क्रं १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपी क्रं २ याचे सांगणेवरुन आरोपी क्रं १ याने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या तंबाखुजन्य/गुटखा/सुंगधी सुपारी पदार्थाचे सेवनाने मुखाचे कर्करोग व इतर विकार होऊन शारिरीक हानी होऊ शकते हे माहित असताना देखील ८१,८१०/- रु.किं.चा. गुटखा (मुददेमाल) स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी विक्री करीता स्वतःचे ताब्यात बाळगलेल्या स्थितीत मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जायभाये ८८०५१११९१९ |

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी २७१/२०२४.भा.द.वि.कलम.४२०,४०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०८/१२/२०२३ रोजी दुपारी ०२.०० वा. ते दिनांक २५/०१/२२४ रोजी दुपारी १२.०० वा.चे दरम्यान मोरेला सोसायटी,फ्लॅट नंबर-ए-५०३,सरकार चौक, सिट्रीन सोसायटी जवळ, मारुंजी पुणे

गुन्हा दाखल :- दि १०/०३/२०२४ रोजी २०/१९ वा.

फिर्यादी :- पराग प्रफुल लोहगावकर वय-३५ वर्षे धंदा-नोकरी रा.मोरेला सोसायटी फ्लॅट नंबर-ए-५०३, सरकार चौक, सिट्रीन सोसायटी जवळ, मारुंजी पुणे मुळगाव-भगवान नगर, यशोदा नगर जवळ, ता.अमरावती जि.अमरावती

आरोपी :- १)४४७४८०६१११०४वरील अनोळखी व्यक्ती
2)ROWE PRICE STOCK PULLING GROUP D८८नावाचा व्हाटसअप ग्रुप
3) IND SES नावाचे ॲप

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे मोबाईलवरील व्हाट्सअप वर ४४७४८०६१११०४ वरील अनोळखी व्यक्तीने व्हाटसअप मेसेज करुन फिर्यादी यांना ROWE PRICE STOCK PULLING GROUP D८८नावाचे व्हाटसअप ग्रुपवर जॉईन करण्यासाठी सांगुण फिर्यादी यांना IND SES नावाचे ॲप डॉऊनलोड करुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांना ट्रेडींग करुन त्यादवारे नफा कमविण्याचे आमीष दाखवुन फिर्यादी यांची एकुण २९,६३,५९९/- रुपयांची फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि कांदे ९५५२५५१८६६

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- आळंदी ६२/२०२४ भादवि कलम ३४१,३२६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०८/०३/२०२४ रोजी दुपारी ०१/१५ वा मौजे आळंदी तालुका खेड जिल्हा पुणे गावाचे हद्दीतील आवारे हॉस्पिटलचे समोरील रोडवर

गुन्हा दाखल :- दि ११/०३/२०२४ रोजी ००.०५ वा

फिर्यादी :- प्रशांत सदाशिव ईनामदार वय ४० वर्ष धंदा मजुरी रा मरकळ रोड स्टेट बँकेचे पाठीमागे शारदा जोगळेकर यांची रुम मध्ये आळंदी ता खेड जि पुणे

आरोपी :- माऊली वामनराव पपूले राहणार सखाराम महाराज मुंगसे यांची रुम केळगाव तालुका खेड जिल्हा पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने याने त्यांचे हातातील चौकोनी आकाराचा लोखंडी पाईप घेऊन येवून फिर्यादीला अडवून तू माझी बायको बरोबर बोलत आहे काय असे विचारुन फिर्यादी त्यास मी तुला ओळखत नाही मी कशाला तुमच्या बायकोबरोबर बोलू असे बोलून फिर्यादी पुढे चालू लागले असता त्याने पाठीमागून येऊन त्याचे हातातील लोखंडी पाईपाने फिर्यादीचे दोन्ही पायावर व उजवे हाताचे बोटावर मारहाण करुन डावे पायास फ्रॅक्चर करुन गंभीर जखमी केले आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि खडके ७७४१९९६३४३